माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

**रामाआ - अपील क्र. अम- २६२५/२०१४**

अपिलार्थी श्री नंदलाल रमणलाल भट्टड
गांधी चौक, खामगाव जि.बुलडाणा

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, खामगाव जि.बुलडाणा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, बुलडाणा जि.बुलडाणा

**द्वितीय अपील सुनावणी दिनांक - ३०/३/१७**

अपीलार्थी यांनी जोडपत्र-अ दि.२८/२/१४ च्या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये जोडपत्र-क नुसार दि.२४/६/१४ रोजी आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील दाखल केले. त्यामध्ये आयोगाने दि.९/३/१७ रोजी (आदेश निर्गमित दि.१५/३/१७) सुनावणी घेतली व मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोरील रिट पिटीशन नं.१३०४/२००८ (with Civil Application No.15469/2016) जळगाव जिल्हा अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक असोसिएशन लि.जळगाव विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर चार मध्ये दि.१३/२/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानूसार कृषि उत्पन्न बाजार समितीला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नूसार माहिती देणे बंधनकारक असल्यामुळे खालीलप्रमाणे अंतरीम आदेश पारीत केले होते.

> जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस २१ दिवसात माहिती द्यावी व तसा अनुपालन अहवाल पुढील तारखेस आयोगास सादर करावा. माहिती देण्यास विलंब झाल्यास शास्तीची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
> पुढील सुनावणी - ३०/३/१७

वरील अंतरीम आदेशाच्या अनुपालनासाठी आज दि.३०/३/१७ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अपीलार्थी हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री ए.एस.शास्त्री, सहकार अधिकारी श्रेणी-१ अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, खामगाव हजर आहेत. जन माहीती अधिकारी श्री डी.एन.देशमुख व त्यांचे वतीने ॲड.श्री राजेंद्र पांडे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, खामगाव यांनी दि.३०/३/१७ अन्वये आयोगाकडे लेखी खुलासा सादर करुन नमुद केले की, आयोगाने पारीत केलेला अंतरीम आदेश जा.क्र.अ.२६८९/२०१४/२१९७/२०१७ दि.१५/३/१७ ची प्रत त्यांना पाठविण्यात आली असुन सदरविषयी कृषि उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळास अपील दाखल करावयाचे असून सदर प्रकरणी आयोगाने पारीत केलेला आदेश हा अंतीम आदेश नसल्याकारणाने व सदर प्रकरणी आज दि.३०/३/१७ रोजी आयोगासमोर सुनावणी ठेवण्यात आल्याने अद्यापपावेतो या प्रकरणी अपील दाखल करता येऊ शकलेले नाही. तेंव्हा सदर प्रकरणी आयोगाने अंतीम आदेश पारीत करावा किंवा या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात अपील दाखल होईपावेतो वेळ देण्यात यावा.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीने दि.२८/२/१४ रोजी जोडपत्र-अ नूसार जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, खामगाव यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलडाणा यांचेकडे दि.२८/४/१४ रोजी प्रथम अपील दाखल करुन त्याच्या कारणामध्ये मागितलेली माहिती मुदतीच्या आत मिळाली नाही असे नमुद केले होते. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३/६/१४ रोजी आदेश निर्गमित करुन जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, खामगाव यांनी अपीलार्थीस विनामुल्य १५ दिवसाच्या आत शक्य झाल्यास लवकरात लवकर डाक नोंद पत्रान्वये माहिती पुरवावी असे निर्देश दिले होते. त्यानूसार जन माहिती अधिकारी यांनी पुर्तता केली नाही म्हणुन अपीलार्थीने आयोगाकडे प्रस्तुतचे द्वितीय अपील दाखल करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश झाल्यानंतरही माहिती मिळाली नाही असे नमुद केले होते. त्यानंतर आयोगाकडे दाखल झालेल्या प्रस्तुतच्या द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दि.९/३/१७ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपीलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री आर.पी.गाडे सहा.सहकार अधिकारी नांदुरा व जन माहिती अधिकारी श्री दिलीप देशमुख. तसेच जन माहिती अधिकारी तर्फे ॲड.श्री राजेंद्र पांडे हजर होते. दि.९/३/२०१७ रोजी सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१३/२/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानूसार कृषि उत्पन्न बाजार समितीला माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत असल्यामुळे माहिती देणे बंधनकारक असल्याने जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरवून अनुपालन अहवाल दि.३०/३/१७ रोजी सादर करावा असे जन माहिती अधिकारी यांना दि.९/३/१७ रोजी आयोगाने समक्ष सांगितले होते तसेच लेखी अंतरीम आदेश दि.१५/३/१७ रोजी निर्गमित करण्यात आला होता. त्यामागील उद्देश हा होता की, पुढील तारीख दि.३०/३/१७ पुर्वी अपीलार्थीस माहितीचे प्रदान होवून त्याबाबत अनुपालन अहवाल आयोगास सादर व्हावा. परंतु त्याचे पालन झाले नाही व दि.३०/३/२०१७ पर्यंत अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाची अवहेलना केलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. याउपर आयोगाने पारीत केलेला अंतरीम आदेश हा अंतीम आदेश नसल्याकारणाने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करता येऊ शकले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या लेखी खुलाशात नमुद करुन सदर प्रकरणी आयोगाने अंतीम आदेश पारीत करावा किंवा या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात अपील दाखल होईपावेतो वेळ देण्यात यावा असे नमुद केले आहे. असे नमुद करतांना आयोगास साधी विनंती सुध्दा केलेली नाही व आयोगास आदेश दिले आहेत. ही गंभीर बाब आहे त्याची आयोग दखल घेत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३/६/१४ रोजी आदेश निर्गमित करुन १५ दिवसात विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते. त्या निर्णयाविरुध्द जन माहिती अधिकारी यांना मा.उच्च न्यायालयात जाण्यापासून कोणीही रोखले नव्हते. परंतु ते तेंव्हा उच्च न्यायालयात गेले नाहीत व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानूसार १५ दिवसाच्या मुदतीत माहितीही दिली नाही. त्यानंतर आयोगाने मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या दि.१३/२/१७ च्या आदेशाच्या आधारे दि.९/३/१७ रोजी माहिती पुरविण्यासंबंधी अंतरीम आदेश पारीत करुन त्याच्या अनुपालनासाठी दि.३०/३/१७ रोजी सुनावणी ठेवली असता जन माहिती अधिकारी हजर राहिले परंतु त्यांनी माहितीची पुर्तता केली नाही उलट मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करावयाचे असल्याचे खुलाशामध्ये नमुद केले. यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे स्पष्ट होते.

सारांशाने, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस जोडपत्र-अ दि.२८/२/१४ नुसार ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहिती दिली नाही, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.३/६/१४ च्या निर्णयानूसार १५ दिवसामध्ये माहिती दिली नाही तसेच आयोगाने दि.९/३/१७ रोजी पारीत केलेल्या अंतरीम आदेशाची पुर्तता करुन त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल दि.३०/३/१७ रोजी सादर करण्यासंबंधी निर्देश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी सुनावणीस हजर राहिले परंतु त्यांनी माहितीची पुर्तता केली नसल्यामुळे आयोगाच्या आदेशाची सुध्दा त्यांनी अवहेलना केली आहे. त्यामुळे प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**आदेश**

**१.** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, खामगाव यांनी

२. आयोगाच्या दि.९/३/१७ च्या अंतरीम आदेशाचे पालन न केल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, खामगाव श्री दिलीप मार्तंडराव देशमुख यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) नूसार **रु.५,०००/-** (रु.पाच हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येते. त्यांनी सदरची रक्कम विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे त्वरीत जमा करावी.

३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने विद्यमान जन माहिती अधिकारी यांना पाठवावी व त्यासंबंधीची पोच त्यांचेकडे प्राप्त करावी तसेच त्यांचेकडून वरील शास्तीची रक्कम वसुल करुन माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत संबंधित लेखाशिर्षामध्ये चालानद्वारे जमा करावी व चालानच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरीलप्रमाणे आदेश देवून प्रस्तुतचे अपील निकाली काढण्यात येते.

**(संभाजी सरकुंडे)**
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

**प्रत - अपील शाखा**

जा.क्र.शा.प्र.अ.क्र.२६२५/२०१४/३३२९/२०१७ दि. २१/६/१७

जिसकार/